-: प्रेसनोट दिनांक- १९/०६/२०२० :-

**राहुल प्रल्हाद बट्टेवार, वय ४५, पद-वाहन चालक, राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर सध्या प्रतिनियुक्ती नेम. वैद्यकीय अधीक्षक कार्यालय नं. २, छ.प्र.रा.शासकीय रूग्णालय (सी.पी.आर.), कोल्हापूर, वर्ग-३, रा. ५९२, पंचरत्न कॉलनी, ठोंबरे मळा, कसबा बावडा, कोल्हापूर, यांनी लाच स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार यांना कोरोना संसर्गाच्या दृष्टीने सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे वॉर्डबॉयची प्रथम कंत्राटी पध्दतीने कर्मचारी भरती होणार आहे आणि काही दिवसानंतर त्यांना कायमस्वरुपी कामावर हजर करुन घेणार असलेबाबत लिपीक बट्टेवार यांनी सांगितले होते. त्यावेळी तक्रारदार यांनी बट्टेवार यांना त्यांना व त्यांचे भावास वॉर्डबॉय म्हणून कंत्राटी पध्दतीने व त्यानंतर कायमस्वरुपी कामावर हजर करुन घेणेची विनंती केली. त्यावेळी बट्टेवार यांनी तक्रारदार व त्यांचे भावाला वॉर्डबॉय म्हणून कंत्राटी पध्दतीने कामावर हजर करुन घेणेसाठी रितसर अर्ज स्वत: भरतो असे सांगून, त्यांनी तक्रारदार यांना दोघांचे आधार कार्डची झेरॉक्स व दोन फोटो घेवून येण्यास सांगितले. तसेच तक्रारदार व त्यांचे भावाला सी. पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे वॉर्डबॉय म्हणून प्रथम कंत्राटी पध्दतीने त्यांच्या वरीष्ठांना सांगून कामावर घेणार आणि त्यानंतर कायमस्वरुपी कामावर हजर करुन घेण्याची ऑर्डर वरीष्ठ कार्यालय, मुंबई येथील आरोग्य विभागामधून काढून देतो. परंतू त्याकरीता तु मला ५,००,०००/- रुपये द्यावे लागतील, तरच मी तुमच्या दोघांची वॉर्डबॉय म्हणून प्रथम कंत्राटी पध्दतीवर व त्यानंतर कायमस्वरुपी कामावर हजर राहण्याची ऑर्डर काढून देईन, नाहीतर देणार नाही असे सांगुन लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी दि. १७/०६/२०२० रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे लिपीक बट्टेवार यांच्याविरूध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १७/०६/२०२० रोजी सीपीआर हॉस्पीटल, कोल्हापूर येथे ब्युरोचे कार्यप्रणालीप्रमाणे पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये लिपीक बट्टेवार यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना व त्यांचे भावास सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे कोरोना कक्षात वॉर्डबॉय म्हणून प्रथम कंत्राटी पध्दतीने त्यांच्या वरीष्ठांना सांगून कामावर घेणार आणि त्यानंतर कायमस्वरुपी कामावर हजर करुन घेण्याची ऑर्डर वरीष्ठ कार्यालय, मुंबई येथील आरोग्य विभागामधून काढून देणेसाठी रू. ५,००,०००/- लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. १९/०६/२०२० रोजी पुन्हा बट्टेवार यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडुन पुर्वीचे मागणीप्रमाणे ५,००,०००/- रू. लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हफ्ता म्हणुन २५,०००/- रू. स्विकारण्याचे मान्य करून उर्वरित रक्कम एक रक्कमी लिपीक बट्टेवार सांगितली तेव्हा देणेस सांगुन रू. २५,०००/- लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे लागलीच सी पी आर हॉस्पीटल, कोल्हापूर येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी वाहन चालक राहुल बट्टेवार यांनी मागणी केले रक्कमेपैकी पहिला हफ्ता २५,०००/- रू. स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदर प्रकरणी राहुल प्रल्हाद बट्टेवार, पद-वाहन चालक, राजर्षि छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर सध्या प्रतिनियुक्ती नेम. वैद्यकीय अधीक्षक कार्यालय नं. २, छ.प्र.रा. शासकीय रूग्णालय (सी.पी.आर.), कोल्हापूर, वर्ग-३ यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोदं करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. शामसुंदर बुचडे, पोना संदीप पडवळ, पोकॉ रुपेश माने व मयुर देसाई, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४,

५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.